# वाङ्मयीन संदर्भ
## आणि
# अवलोकन

डॉ. सोमनाथ कोमरपंत

मित्र प्रकाशन

# वाङ्मयीन संदर्भ आणि अवलोकन...

प्रथमावृत्ती : १५ ऑगष्ट १९९२

○ प्रकाशन क्र. - ४

© सौ. मंदा सोमनाथ कोमरपंत

○ प्रकाशक :
भालचंद्र गांवकर
मित्र प्रकाशन
किटोर्ले - बेतोडा
फोंडा - गोवा ४०३ ४०९.

○ मुद्रक :
सम्राट ऑफसेट प्रिंटर्स
बाणस्तारी - गोवा.

○ मुखपृष्ठ :
गोविंद नाईक

○ मूल्य :
मित्र प्रकाशन
रु. ८०/-

# ज्ञानेश्वरीतील काव्यसौंदर्य

ज्ञानेश्वरी हा मराठीतील एक श्रेष्ठ काव्यग्रंथ आहे. सातशे वर्षे उलटली तरी त्यातील अम्लान आशय रसिकमनाला आनंद देत आहे. ज्ञानेश्वरांसारख्या अलौकिक प्रज्ञा आणि प्रतिभा लाभलेल्या श्रेष्ठ संतपुरुषाने लिहिलेला हा ग्रंथ आहे. आर्त जनांसाठी त्यांनी उत्कटतेने हा वाग्यज्ञ मांडलेला आहे. वाङ्मयीन महत्ता या ग्रंथात आहेच पण त्याचबरोबर आपल्या सांस्कृतिक संचिताचा तो समृद्ध आविष्कार आहे. आपल्या संस्कृतीचा तो मानदंड आहे.

ज्ञानेश्वरी हा तत्त्वज्ञानाचे• निरूपण करण्यासाठी लिहिलेला ग्रंथ की काव्यग्रंथ अशी चर्चा अभ्यासकांत दीर्घकालापासून चालत असली तरी या ग्रंथातील अपूर्व वाग्विलास पाहिल्यानंतर तो काव्यग्रंथ असल्याची खात्री पटते. ज्ञानेश्वरांनी आपल्या उत्तुंग प्रतिभेने तत्त्वज्ञानाचे आत्मज्ञानात रूपांतर केलेले आहे. त्यांच्या आत्मप्रत्ययशील, परिणत मनाचे स्वच्छ प्रतिबिंब ज्ञानेश्वरीत पडलेले आहे. निखळ सौंदर्यदृष्टी लाभलेल्या संवेदनशील कवीचे मन ज्ञानेश्वरीत प्रभावी ठरलेले आहे. तरी त्यामुळे आशयाला बाधा येत नाही.

ज्ञानेश्वरीतील काव्यसौंदर्याचा आस्वाद घेण्यापूर्वी ज्ञानेश्वरांच्या लौकिक व अलौकिक व्यक्तिमत्वाचा संदर्भ ध्यानात घ्यावा लागतो. ज्ञानेश्वरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व कसे आहे ? सारांशरूपाने ते सांगणे अवघड आहे. पण त्यांची मानसमूर्ती पुरेपूर ज्ञानेश्वरीत उमटलेली आहे. वास्तविक पाहता ज्ञानेश्वरी हा भगवद्गीतेवरील भाष्यग्रंथ आहे. ही गीता म्हणजे साक्षात् श्रीकृष्णाने स्वतःच घडविलेली शब्दमय मूर्ती आहे. महामती व्यासांनी भारतीय तत्त्वज्ञानाचा गाभा नेमकेपणाने ओळखला. त्यांनी तळहातावरील आवळ्याच्या आकारात हे ज्ञान आणले आहे. अशा महाभारतासारख्या श्रेष्ठ काव्यातील गीतेचा भाग ज्ञानेश्वरांनी वेगळा काढला त्यांनी मर्म समर्थपणे उकलून दाखविले. ओवीछंदाच्या माध्यमातून गीतारूपी तत्त्वज्ञान सामान्य जनांपुढे ठेवले. महाभारत आणि गीता यांच्या मोठेपणात त्यांनी भर घातली. हे अमृताचे कुंभ प्राकृतात आणून त्या काळात त्यांनी वाङ्मयीन क्षेत्रात क्रांतीच केली.

ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांचा भारतीय तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास प्रत्ययास येतो. कुमारवयात त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिली. पण हा ज्ञानमय वारसा त्यांना पूर्वपरंपरेने दिला. ज्ञानेश्वरांची स्वतःची अशी निश्चित भूमिका ज्ञानेश्वरीत दिसते. स्वतंत्र

जीवनदृष्टी दिसते. त्याच्याविषयीची नवी जाणीव तीत प्रकट होताना दिसते. करुणेचे नेत्र त्यांना लाभलेले होते. त्यामुळे विश्वमंगलाचे मनोहर स्वप्न त्यांनी आपल्या रेखेच्या वाहणीतून रेखाटले. त्यांनी शारदेचे लावण्यरत्नभांडार खुले केले. या अभिनव वाग्विलासिनीचे रूपसौंदर्य न्याहाळताना शीतल चांदण्याच्या वर्षावात आपण न्हाऊन निघाल्याचा प्रत्यय येतो. साहित्यातील माधुर्य ज्ञानेश्वरीत अतिमधुर झालेले आहे. येथे मतीवर भावाचा फुलोरा आलेला आहे. प्रमेय रुचीस आलेले आहे. ज्ञानेश्वरीतील काव्यसौंदर्याचा आस्वाद घेताना रसिकांची स्थिती कशी होते ? ज्ञानेश्वरीतील शब्दांतच हे सांगावे लागेल :

*अर्धोन्मीलित डोळे । वर्षताती आनंदजळें ।*
*आतुलिया सुखोर्मीचेनि । बाहेरि कांपे ।।*

अध्यात्मविद्येचे निरूपण करणे हे गीतेने आपले उद्दिष्ट मानले. ज्ञानेश्वरांना त्याची पदोपदी जाणीव आहे. पण याचबरोबर शब्दसौंदर्याचे भांडार खुले करून त्यांनी दुजी सृष्टी निर्माण केली आहे. शांतरसाचे अभिनव उद्यान त्यांनी निर्माण केले आहे. ही नवनिर्मिती आहे. ज्ञान, कर्म आणि भक्ती ही आपल्या भारतीय जीवनाची त्रिपुटी आहे. ज्ञानेश्वरीत ती भक्तीत परिणत झालेली आहे. हा आविष्कार चिरप्रसन्न व चिररुचिर झालेला आहे.

ज्ञानेश्वरीत रुपके, दृष्टान्त, उपमा, उत्प्रेक्षा, प्रतीके, रुप-रंग रस - नाद - स्पर्श इ. संवेदना यांची रमणीय पखरण दिसते. अलंकार व्यक्तीला बाहेरून सजवितात. तसा प्रकार येथे झालेला नाही. येथे कोणी कोणाला अलंकारिले याचाच मुळी प्रश्न पडतो. अनुभव आणि आविष्कार यांचे अद्वैत ज्ञानेश्वरीत प्रत्ययास येते. हे काव्य विनयशील वृत्तीने रचलेले आहे. पण आत्मविश्वासही त्यांच्या उद्‌गारांत ओतप्रोत भरलेला आहे :

*पांखफुटे पांखिरू । नुडे तरी नभीच थिरू ।*
*गगन आक्रमी सत्वरू । तो गरुडही तेथ ।।*
*राजहंसाचे चालणें । भूतळीं जाहलें शाहाणें ।*
*आणिके काय कोणें । चालवेंचि ना ?*

ज्ञानेश्वरीतील रुपकसौंदर्याचा आस्वाद घेताना ज्ञानेश्वरांच्या निर्मितिशील कविमनाचा प्रत्यय येतो. त्यांच्या या नागर पदबंधांना तात्कालिकतेचे बंधन नाही. ते आजही ताजे, टवटवीत वाटतात. 'पुण्याची पहाट', 'उन्मेषनेत्र', 'सुखाचा डोह', 'उन्मेखचांदिणे', 'महासुखाची दिवाळी', 'विवेकद्रुम' 'सारस्वताचे झाड', 'देहाभिमानाचा वारा', 'आत्मसुखाची बाळलेणी', 'संवाद-संगमातील स्नान',

'ज्ञानामृताची जान्हवी', 'ग्रंथसिद्धीचा सोहळा', 'आनंदसरोवरीची कमळे', 'आभाळाची बुंथी' 'प्रतीतीचे माजघर', 'भावाचा फुलौरा', 'सामरस्याचे प्रयाग', 'विवेकाचा ओलावा', 'स्नेहपल्लव', 'गीतार्थाची मुक्तमुदी', 'वेल्हाळ प्रज्ञावेली' व 'फुलांचे डोळे' या मोजक्याच रुपकांचा उल्लेख केला तरी त्याची खात्री पटेल.

कुंडलिनीच्या वर्णनात रुपकांची मालिकाच आढळते :

*ती कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा ।*
*जया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ।*
*जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मया शिवाची करंडी ।*
*जे प्रणवाची उघडी । जन्मभूमी ।*

येथे अमूर्ताल मूर्त रूप प्राप्त झालेले आहे. अनाकाराला आकारशिल्प प्राप्त झालेले आहे. ते उत्कृष्ट असे शब्दचित्र आहे. अशाच दृक्प्रतिमा पुढील वर्णनातही येतात :

*नागिणीचीं पिलें । कुंकुमे नाहलें*
*वळण घेऊनि आलें । सेजे जैसे*
*तैसी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी*
*अधोमुख सर्पिणी । निदेली असे*
*विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वाळांची घडी*
*पंधरेयाची चोखळी । घोंटीव जैसी*

उपमासौंदर्य हेही ज्ञानेश्वरीचे वैभवलेणे आहे. निसर्गाचे व मनुजव्यवहाराचे, त्यांनी केलेले सूक्ष्मावलोकन त्यातून प्रत्ययास येते. प्रतिपाद्य विषयाशी त्या उपमांची सांगड घालण्यात ज्ञानेश्वरांनी मर्मज्ञता दाखविली आहे. अंतरंगातील सद्भावना इंद्रियांद्वारे प्रकट होते हे स्पष्ट करताना ते म्हणतात :

*स्फटिकगृहींचे डोलत दीप जैसे ।*

दंभ नसलेला ज्ञानी पुरुष आपले पुण्यकर्म लपवून ठेवण्याची धडपड करतो हा अनुभव प्रकट करताना :

*१) खडाणे आला पान्हा । लपवी जेवि अर्जुना ।*
*२) का लपवी पण्यांगना । वडिलपण ।*
*३) ना तरी कुळवधू लपवी । अवेवांते ।*
*४) नाना कृषीवळु आपुलें । पांघुरवी पेरिलें ।*

अशी उदाहरणे देतात. अंतरंग शुद्ध नसताना वरपांगी कर्मकांडाचे नाटक व्यर्थ ठरते हे विविध उपमानांनी ते स्पष्ट करतात.

*१) मृत जैसा शृंगारिला ।*
*२) गाङव तीर्थी न्हाणिला ।*
*३) कडुदुधिया माखिला । गुळें जैसा ।*
*४) वोसगृही तोरण बांधिलें ।*
*५) कां उपवासी अन्नें लिंपिलें ।*
*६) कुंकुमसेंदुर केलें । कांतहीनतेनें ।*

रसिक श्रोत्यांनी कौतुक केल्याबरोबर वक्तृत्वाला बहर येतो हे कितीतरी उपमांद्वारे विशद केले आहे. उदा. सुवायें मेघ सांवरे । जैसा भरे ।

संतांच्या निकट सहवासात आल्यावर अज्ञानाचा लवलेश राहत नाही हे त्यांनी पुढील उपमेद्वारे सांगितले आहे.

*नाहीं उणीं सामुद्रकें । लक्ष्मीयेसी ।*

सद्‌गुरूच्या कृपेने माणसाच्या सर्व इच्छा - आकांक्षा पूर्ण होतात हे सांगताना ते :

*१) जैसा डोळ्यां अंजन भेटे । ते वेळे दृष्टीसी फांटा फुटे ।*
*मग वास पाहिजे तेथे प्रगटे । महानिधी*
*२) कां चिंतामणी आलिया हातीं । सदा विजयवृत्ती मनोरथी ।*

या उपमा योजतात.

गुरूला वंदन ही जीवनातील महत्त्वपूर्ण गोष्ट होय असे ज्ञानेश्वरांना वाटते. हा विचार त्यांनी

*१) जैसें मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती ।*
*२) कां तीर्थे जियें त्रिभुवनीं । तियें घडतीं समुद्रावगाहनीं ।*
*३) ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ ।*

ग्रंथाच्या आकलनासाठी, आस्वादासाठी गंभीर वृत्तीची व स्थिर अंतःकरणाची आवश्यकता आहे. हे सांगताना ते :

*कां आपुलो ठावो न सांडिता । आलिंगिजे चंद्रु प्रगटता ।*
*हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ।*

अशी सुकुमार उपमा ते योजतात.

रुपरस-गंध-स्पर्श इ. संवेदनांचा प्रत्यय ते वेळोवेळी आणून देतात. उदा.

*सहज मलयानिल मंद सुगंध । तया अमृताचा होय स्वाद ।*
*आणि येथेहि जोडे नाद । जरी दैवगत्या ।*
*तरी स्पर्शे सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी ।*
*तेवीचि कानांकरवी म्हणवी । बापु माझा ।*

योग्याच्या शरीराच्या तेजाचे वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी उपमा; रुपये आणि उत्प्रेक्षा यांचा स्वरमेळ साधलेला आहे :

*मग काश्मीरीचे स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ ।*
*अवयवकांतीची मांव । तैसी दिसे ।।*
*नातरी संध्यारागींचे रंग । काढुनि वळिलें तें ओंग ।*
*की अंतर्ज्योतीचे लिंग । निर्वाळिलें ।।*
*कुंकुमाचे भरीव । सिद्धरसाचें वोंतीव ।*
*मज पाहता सावेव । शांतिचि ते ।।*
*ते आनंदचित्रींचे लेप । नातरी महासुखाचें रूप ।*
*कीं संतोषतरुचें रोप । थांबलें जैसें ।।*
*तो कनकचंपकाचा कळा । की अमृताचा पुतळा ।*
*नाना सासिंनला मळा । कोंवळिकेचा ।।*
*हो कां जे शारदियेनि बोले । चंद्रबिंब पाल्हेलें*
*कां तेजचि मूर्त बसलें । आसनावरी ।।*

स्वतंत्रपणे त्यांचे सौंदर्य प्रतीत होतेच. पण या सर्वांच्या समुचित साहचर्याने अपार्थिव सौंदर्याचे लेणेच आकारास येते. अज्ञेयाच्या वर्णनातही ज्ञानदेवांच्या विलक्षण वाग्वैभवाचा प्रत्यय येतो.

*ऐसें शब्दजात माघौतें सरे । तेथे संकल्पाचे आयुष्य पुरे ।*
*वाराही जेथ न शिरे । विचाराचा ।।*
*जें उन्मनियेचें लावण्य । जें योगद्रुमाचें फळ ।*
*जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ।।*
*जें आकाराचा प्रांतु । जें मोक्षाचा एकांतु ।*
*जेथे आदि आणि अंतु । विरोनि गेले ।।*
*जें महाभूतांचे बीज । जें महातेजाचें तेज ।*
*एवं पार्था जे निज । स्वरूप माझें ।।*

उपमांच्या साहाय्याने रुचिर कल्पनाचित्रे ज्ञानदेवांनी पुढील ओव्यांत रेखाटली

आहेत. वास्तविक जीवन्मुक्त योग्याचे अत्यंत रसिकतेने केलेले हे वर्णन आहे. सुगंधी परागकणांची समृद्धी व्हावी ही आकांक्षा त्यांनी बाळगली आहे :

*आणि ऋतु बरवा शारदु । शारदीं पुढती चांदु ।*
*चंद्री जैसा संबंधु । पूर्णिमेचा ।।*
*कां वसंती बरवा आरामी । आरामीं हा प्रियसंगमी ।*
*संगमी आगमु । उपचारांचा ।।*
*नाना कमळीं पांडवा । विकास जैसा बरवा ।।*

गुरुकुलाचे नाव ऐकताच त्या महासुखामुळे गगनाएवढा आनंद होतो. त्या भरात गगनाला गवसणी घालावी अशी ऊर्मी अंतःकरणात निर्माण होते असे ज्ञानदेव म्हणतात. त्या अनुभवाचे वर्णन करताना त्यांनी खालील उपमा योजल्या आहेत :

*ऐसेया गुरुग्रामींचे आलें । कां स्वयें गुरुंनीच धाडिलें ।*
*तरी गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ।।*
*कां सुकतया अंकुरा । वरि पाडिलिया पीयूषधारा ।*
*नाना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ।।*
*नातरी रंकें निधान देखिलें । आंधळिया डोळे उघडले ।*
*भणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ।।*

स्थितप्रज्ञ पुरुषाच्या मनोधर्माचे वर्णन करताना ज्ञानदेव उपमा योजतात :
*हाती हाला फुलीं । पासवणा जेवीं न घाली ।।*
*तैसा नोहोटे दुर्वाक्यशेलीं । सेलिला सांता ।।*
*क्षीरार्णवाचां कल्लोळीं । कंपु नाही मंदराचळीं ।*
*कां आकाश न जळें जाळीं । वणवियाचां ।*

कोणताही संबंध नसताना निर्गुण ब्रह्म सर्वांस धारण करीत असते. एरव्ही ते माया दृष्टीने घडते हे पटवून देताना ज्ञानदेव म्हणतात :

*तरि तें गा धरणें ऐसे । अभ्रातें जेवीं आकाशें ।*
*कां प्रतिवदन जैसें । आरसेनि ।*
*सूर्य प्रतिमंडळ । जैसेनि धरी सलिल ।*
*का रश्मिकरीं मृगजळ । धरिजे जेवीं ।।*

ज्ञानेश्वरीचे रससौंदर्य हे तिचे व्यवच्छेदक लक्षण आहे. शृंगाराच्या माथ्यावर

पाय ठेवून अदम्य आत्मविश्वासाने ज्ञानेश्वरांनी शांतरसाचा परिपोष केला. ऐंद्रिय संवेदनांद्वारे अतींद्रिय अनुभव प्राप्त करून दिला. ज्ञानेश्वरीला प्राप्त झालेला परतत्त्वस्पर्श हे तिची अनोखे गुणवैशिष्ट्य आहे. या आनंदाचे स्वरुप :

*मीनले गंगायमुनेचे ओघ । तैसें रसा जाहलें प्रयाग ।*
*म्हणोनि सुस्नात होत जग । आघवें एथ ।*

शांतरसाचा महिमा वर्णन करताना ज्ञानदेव उद्‌गारतात -

*जयाचिया बरवेपणीं कीजे । आठां रसांची वोवाळणी ।*
*जो सज्जनाचिये आयणी । विसांवा जगीं ।।*
*तो शांतुचि अभिनवेल । ते परियसा मऱ्हाटे बोल*
*जे समुद्राहूनि सखोल । अर्थभरित ।।*

ही रसनिर्मिती करण्याविषयीचा आत्मविश्वास पुढील ओव्यांतून प्रकट होतो :

*दाऊं वेल्हाळे देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।*
*अमृतातें चुकी ठेवी । गोडिसेपणें ।।*
*बोल वोल्हावतेनि गुणें । चंद्रासि घे उमाणे ।*
*रसरंगीं भीलवर्णे । नादु लोपी ।।*
*खेचराचियाही मना । आणि सात्त्विकाचा पान्हा ।*
*श्रवणासवें सुमना : समाधि जोडे ।।*

ज्ञानेश्वरीत केवळ काव्यसौंदर्य नाही, ती जीवनसौंदर्याचा प्रत्यय देणारी आहे. परिपूर्णतेचा ध्यास तिच्यात आहे. गेली सात शतके आपल्या समाजमानसावर, साहित्यावर व भाषेवर ती नित्यनूतन संस्कार करीत आहे. ज्ञानेश्वरीचा आस्वाद घेताना पर्यायाने ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वाशी आपला हृदयसंवाद जुळतो. त्यांच्या वैराग्यशील अंतःकरणातील जीवनोत्सुकतेच्या कोंभाची लवलव मनात प्रसन्नता निर्माण करते.

▲▲